महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सॲप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : तिसरे | अंक : २०२ वे | दिनांक : १६/०७/२०२६ | वार : गुरुवार

## 'लाडक्या बहिणी' योजनेत महायुतीची फसवणूक ; १.६५ लाख कोटींचा हिशोब मागत सुषमा अंधारेंचा हल्लाबोल



**मुंबई :** शिवसेना ठाकरे गटाच्या नेत्या सुषमा अंधारे यांनी 'मुख्यमंत्री लाडकी बहीण' योजनेच्या अंमलबजावणीवरून महायुती सरकारवर गंभीर आरोप केले आहेत. पत्रकार परिषदेत बोलताना त्यांनी योजनेत पात्रता तपासणी न करता लाभार्थ्यांना पैसे वाटल्याचा आरोप करत, अतिरिक्त 3,541 कोटी रुपये नेमके कुठून खर्च करण्यात आले, याचे उत्तर महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी द्यावे, अशी मागणी केली.

अंधारे म्हणाल्या की, लाडकी बहीण योजनेसाठी मुळात २९,६९३ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली होती. मात्र प्रत्यक्षात ३३,२५७ कोटी रुपये खर्च झाल्याने तब्बल ३,५४१ कोटी रुपयांचा अतिरिक्त खर्च झाला. हा पैसा कोणत्या योजनांमधून वळविण्यात आला, हा सर्वात मोठा प्रश्न असल्याचे त्यांनी म्हटले. त्यांनी आरोप केला की, सारथी, महाज्योती, सामाजिक न्याय विभाग तसेच महिला व बालविकास विभागातील इतर योजनांच्या निधीतून पैसे वळविण्यात आले असावेत. सरकारने याबाबत स्पष्ट खुलासा करावा, अशी मागणी त्यांनी केली.

सुषमा अंधारे यांनी दावा केला की, सरकारने टप्प्याटप्प्याने सुमारे ९२ लाख महिलांना योजनेतून वगळले आहे. एका महिलेला महिन्याला १,५०० रुपये म्हणजे वर्षाला १८ हजार रुपये मिळतात. त्यानुसार ९२ लाख महिलांवर किमान एका वर्षात सुमारे १ लाख ६५ हजार ६०० कोटी रुपये खर्च झाले असल्याचा दावा त्यांनी केला. ही आकडेवारी आपण चार चार्टर्ड अकाउंटंटकडून तपासून घेतल्याचेही त्यांनी सांगितले. सरकारने सुरुवातीला पात्रतेची योग्य छाननी न करता केवळ निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर लाभार्थ्यांना पैसे वाटले आणि नंतर मोठ्या प्रमाणावर महिलांना अपात्र ठरवले, असा आरोपही त्यांनी केला.

पत्रकार परिषदेत अंधारेंनी नियंत्रक आणि महालेखापरीक्षक (CAG) यांच्या निरीक्षणांचाही उल्लेख केला. त्यांनी सांगितले की, व्हर्च्युअल पर्सनल डिपॉझिट अकाउंटमध्ये जानेवारी ते मार्च २०२५ या कालावधीत १५,५८६ कोटी रुपये ठेवण्यात आले होते. या निधीचा वापर आणि तो सरकारच्या नियंत्रणाखाली का ठेवण्यात आला, याबाबत CAG नेही प्रश्न उपस्थित केल्याचा दावा त्यांनी केला. योजनेसाठी मंजूर निधीपेक्षा जास्त खर्च झाला असताना इतर योजनांचा निधी वळविण्यात आला का, तसेच हे आर्थिक अनियमिततेचे प्रकरण आहे का, याचे उत्तर सरकारने द्यावे, अशी मागणी त्यांनी केली.

अंधारे यांनी सरकारवर टीका करत विकासाच्या नावाखाली मोठमोठे प्रकल्प दाखवले जात असले तरी आरोग्य, पोषण, आदिवासी भागातील सुविधा, प्राथमिक आरोग्य केंद्रे, रस्ते आणि महिलांच्या सुरक्षेशी संबंधित मूलभूत योजनांकडे दुर्लक्ष झाल्याचा आरोप केला. गर्भवती महिला, कुपोषण, प्रसूतीनंतरची काळजी आणि महिला कल्याणाशी संबंधित योजनांचा निधी इतरत्र वळविल्यामुळे सामान्य नागरिकांना त्याचा फटका बसल्याचे त्यांनी म्हटले.

मोशी कचरा डेपो दुर्घटनेचाही अंधारेंनी उल्लेख केला. या प्रकरणात प्रशासनाने सुरुवातीपासून निष्काळजीपणा केल्याचा आरोप त्यांनी केला. कचरा डेपोशेजारी बांधकाम सुरू असताना आवश्यक सुरक्षाभिंत उभारली गेली नाही, संबंधित अधिकाऱ्यांनी वेळेत हस्तक्षेप केला नाही आणि दुर्घटनेनंतरही प्रशासनाने स्पष्ट माहिती दिली नाही, असा आरोप त्यांनी केला. याप्रकरणी महापालिका आयुक्त, संबंधित प्रकल्प अधिकारी आणि कंत्राटदार कंपनी यांच्यातील आर्थिक संबंधांची चौकशी व्हावी, तसेच जबाबदार अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई करावी, अशी मागणीही त्यांनी केली.

दरम्यान, पत्रकार परिषदेत सुषमा अंधारे यांनी लाडकी बहीण योजनेतील खर्च, निधी वळविणे आणि आर्थिक अनियमिततेच्या आरोपांवर सरकारने स्पष्ट भूमिका मांडावी, अन्यथा आगामी पावसाळी अधिवेशनात हा मुद्दा जोरदारपणे उपस्थित केला जाईल, असा इशाराही दिला.

## ४८ हजार कोटींचे वीजबिल माफ; फडणवीसांची मोठी घोषणा



**मुंबई:** राज्य सरकारने नुकत्याच जाहीर केलेल्या ऐतिहासिक शेतकरी कर्जमाफी योजनेबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा मुंबईत विशेष सत्कार करण्यात आला. या सत्कार सोहळ्याला उत्तर देताना मुख्यमंत्र्यांनी राज्यातील बळीराजासाठी आणखी दोन अत्यंत मोठ्या घोषणा केल्या. साडेसात हॉर्सपॉवर (७.५ HP) पर्यंतच्या कृषी पंपांचे तब्बल ४८ हजार कोटी रुपयांचे जुने थकीत वीज बिल सरकार पूर्णपणे माफ करणार असल्याची मोठी घोषणा त्यांनी केली. तसेच, लवकरच राज्यातील १०० टक्के शेतकऱ्यांना दिवसा मोफत वीज पुरवली जाईल, अशी ग्वाहीही त्यांनी दिली.

यावेळी त्यांनी शेतकरी कर्जमाफी योजनेतील जाचक अटी कशा आणि का काढल्या, यावरही सविस्तर भाष्य केले.

शेतकऱ्यांचा उत्पादन खर्च कमी करण्यासाठी सरकारने उचललेल्या पावलांची माहिती देताना मुख्यमंत्र्यांनी सर्वात मोठी घोषणा वीज बिलांसंदर्भात केली.

साडेसात हॉर्सपॉवरपर्यंतच्या कृषी पंपांचे सध्याचे वीज बिल सरकारने आधीच माफ केले आहे. मात्र, शेतकऱ्यांच्या नावावर जुनी थकीत बिले कागदोपत्री तशीच होती. यामुळे नवीन कनेक्शन घेताना किंवा इतर कामांत शेतकऱ्यांना अडचणी येत होत्या. ही अडचण दूर करण्यासाठी राज्यातील शेतकऱ्यांचे तब्बल ४८ हजार कोटी रुपयांचे जुने थकीत वीज बिल सरकार पूर्णपणे माफ करणार आहे.

"शेतकऱ्याच्या डोक्यावर जुन्या बिलांची टांगती तलवार नको, त्यांची पाटी पूर्णपणे कोरी झाली पाहिजे," या उद्देशाने हा ऐतिहासिक निर्णय घेतल्याचे मुख्यमंत्र्यांनी स्पष्ट केले.

वीज बिल माफ केले म्हणजे वीज कंपनी स्वतःच्या खिशातून पैसे भरत नाही. सर्वसामान्यांच्या बिलावर हा भार पडू नये म्हणून, राज्य सरकार दरवर्षी अर्थसंकल्पातून २५ हजार कोटी रुपये वीज वितरण कंपनीला देत असल्याचे त्यांनी सांगितले.

रात्रीच्या वेळी शेतीला पाणी देताना शेतकऱ्यांना सर्पदंश आणि इतर अनेक जीवघेण्या संकटांचा सामना करावा लागतो. यातून शेतकऱ्यांची मुक्तता करण्यासाठी सरकारने 'सौर कृषी वाहिनी' आणि 'सौर पंप' योजना आणल्या आहेत. सध्या राज्यातील ७६ टक्के शेतकऱ्यांना दिवसा वीज दिली जात आहे. या वर्षाअखेरपर्यंत हे प्रमाण १०० टक्क्यांवर नेण्याचे सरकारचे उद्दिष्ट आहे. आगामी काळात राज्यातील सर्व शेतकऱ्यांना दिवसा ८ ते १२ तास पूर्णपणे मोफत वीज पुरवली जाईल, असा शब्द मुख्यमंत्र्यांनी दिला.

दोन लाख रुपयांपर्यंतची सरसकट कर्जमाफी आणि नियमित कर्ज भरणाऱ्यांना 50 हजार रुपयांचे प्रोत्साहनपर अनुदान, या योजनेची अंमलबजावणी करताना सरकारने सुरुवातीला काही अटी घातल्या होत्या. मात्र, आमदारांच्या आग्रहानंतर त्या अटी रद्द करण्यात आल्याचे मुख्यमंत्र्यांनी सांगितले.

आर्थिक शिस्त लागावी म्हणून २०१९च्या कर्जमाफीचा लाभ घेतलेल्यांना या नवीन योजनेतून वगळण्यात आले होते. मात्र, महायुतीच्या २५-३० आमदारांनी (आमदार रणधीर सावरकर यांच्या नेतृत्वाखाली) मुख्यमंत्र्यांची भेट घेऊन ही अट रद्द करण्याची विनंती केली. यामुळे १२ लाख शेतकरी वंचित राहिले असते. आमदारांचा आग्रह योग्य वाटल्याने सरकारने ही अट रद्द केली. आता जुन्या योजनेत पात्र ठरूनही नंतर थकीत झालेल्या १२ लाख शेतकऱ्यांनाही या २ लाखांच्या कर्जमाफीचा सरसकट लाभ मिळणार आहे.



# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), गुरुवार १६ जुलै २०२६


## मुख्याध्यापकांच्या बदलीची मागणी; ठाकरवाडी शाळेतील पालक आक्रमक



**खुलताबाद (सनिराम गावंडे) :** जुलैजिल्हा परिषद प्राथमिक शाळा, ठाकरवाडी (ता. खुलताबाद, जि. छत्रपती संभाजीनगर) येथील मुख्याध्यापक लहाणे सर यांची तात्काळ बदली करून नवीन शिक्षकाची नियुक्ती करावी, अशी मागणी ग्रामस्थ, पालक व शाळा व्यवस्थापन समितीने तसेच मनसे जिल्हाध्यक्ष राजू घोरपडे यांनी शाळेच्या समस्या जाणून घेतल्या आणी त्यांच्याकडून सुद्धा तक्रार गटशिक्षणाधिकाऱ्यांकडे लेखी निवेदनाद्वारे केली आहे.निवेदनात नमूद केले आहे की, ठाकरवाडी, भिलवाडी व देवठाणवाडी या अतिदुर्गम आदिवासीबहुल 90 टक्के आदिवासी समाज राहतो ठाकरवाडीतील विद्यार्थी या शाळेत शिक्षण घेतात. मात्र, मुख्याध्यापकांकडून नेहमीचेच सातत्याने गैरहजेरी, वेळेआधी शाळेतून जाणे, विद्यार्थ्यांकडे दुर्लक्ष,शाळेकडे दुर्लक्ष करणे तसेच शाळेच्या कामकाजात हलगर्जीपणा होत असल्याचा आरोप पालकांनी केला आहे.तसेच, गेल्या वर्षी विद्यार्थ्यांना मिळणाऱ्या पूरक पोषण आहारापासूनही काही विद्यार्थ्यांना वंचित ठेवण्यात आल्याचा आरोप निवेदनात करण्यात आला आहे. याबाबत पालकांनी व ग्रामस्थांनी यापूर्वी अनेक वेळा तक्रारी करूनही कोणतीही ठोस सुधारणा झालेली नसल्याचे त्यांनी म्हटले आहे.निवेदनानुसार, ग्रामपंचायत कार्यालयात यापूर्वीही संबंधित प्रकरणी तक्रार देण्यात आली होती. केंद्र प्रमुख हार्दे (गल्ले बोरगाव) यांना अनेक वेळा तक्रारी केल्या होत्या परंतु तक्रारी चे काहीही निवारण झाले नसल्यामुळे गावकऱ्यांनी पुढील पाऊल उचलले आहे.तसेच शाळा व्यवस्थापन समिती, उपाध्यक्ष, ग्रामस्थ आणि पालक यांच्या उपस्थितीत बैठका घेऊन मुख्याध्यापकांना सूचना देण्यात आल्या होत्या. मात्र, परिस्थितीत कोणताही बदल झाला नसल्याचा दावा करण्यात आला आहे.विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत असून त्यांचे भविष्य धोक्यात येत असल्याने मुख्याध्यापकांची तात्काळ बदली करून शाळेत नवीन शिक्षकाची नियुक्ती करावी, अन्यथा पुढील काळात तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा पालक व ग्रामस्थांनी दिला आहे.या निवेदनावर शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष गणेश पवार, उपाध्यक्ष वंदना मेंगाळ मनसे चे जिल्हा अध्यक्ष राजु घोरपडे (छत्रपती संभाजीनगर) आणी जालींदर गायकवाड पालक व ग्रामस्थ बाळू मधे,बबन कातवारे, सनिराम गावंडे, खंडू बांगारे ,श्रावण मेंगाळ, सोमनाथ मेंगाळ, गुलाब बांगारे, अर्जुन मधे, साहेबराव मेंगाळ, सलीनाथ मुंजाळ शिवराम मेंगाळ, सखाराम गांगड कडूबा गांगड, शेषराव पथवे, अंकुश मेंगाळ ,संतोष कातवारे नवनाथ आगिवले,भाऊसाहेब बांगारे, संतोष कातवारे, संतोष मेंगाळ, रंगनाथ मधे, भिवाजी मेंगाळ, प्रल्हाद मेंगाळ, संतोष मेंगाळ, रंगनाथ मेंगाळ,तुकाराम भांडारे, असे अनेक पालक व ग्रामस्थ यांनी गटशिक्षणाधिकारी यांना निवेदन दिले.

## जिंतूरचे शासकीय दूध संकलन केंद्र झाले बकाल, बारा वर्षापासून दूध व्यवसाय बंद



**जिंतूर (बी. डी. रामपूरकर) :** तालुक्यातील औंढा रोडवरील पुंगळा औद्योगिक वसाहतीमध्ये असलेल्या शासकीय दूध संकलन व शीतकरण केंद्राच्या इमारतीची अतिशय दुरवस्था झाली असून, लोखंडी शटर जागोजागी सडले आहे. परिसरात प्रचंड घाण साचल्यामुळे या केंद्राला बकाल स्वरूप प्राप्त झाले आहे. कोट्यवधी रुपये खर्च करून बांधलेली इमारत, कर्मचाऱ्यांसाठीची निवासस्थाने आता अखेरची घटका मोजत आहे. जिल्हाधिकारी व जिल्हा दूध उत्पादक अधिकारी यांनी केंद्र चालू करावे, अशी मागणी शेतकऱ्यांकडून होत आहे.शासकीय दूध विकास विभाग व जिल्हा दूध उत्पादक सहकारी संघाच्या निष्क्रिय व भोंगळ कारभारामुळे तालुक्यातील 35 वर्षांपूर्वीच्या जुन्या शासकीय दूध संकलन केंद्रात लाखोची यंत्रसामग्री भंगार झाली आहे. तालुक्यातील शेती व्यवसाय हा निसर्गावर अवलंबून असल्याने शेती व्यवसायासाठी कोरडवाहू क्षेत्राचे प्रमाण जास्त आहे. शेतीला जोड धंदा म्हणून तालुक्यातील 169 गावातील जवळपास 125 गावांतील शेतकरी दूध व्यबसाय करतात. तालुक्यातील दूध संकलन केंद्र सुरू करण्यासाठी प्रशासनाची उदासीनता कारणीभूत ठरत आहे. या दूध संकलन केंद्राची वाट लावण्यात कोणीच कमी पडले नसल्याची बाब समोर आली आहे. दूध संघ, दूध संकलन केंद्र, बर्फाचा कारखानाया सर्व गोष्टी उपलब्ध असतानाही केवळ कागदोपत्री आकड्यांची जमवाजमव करून दूध संकलन केंद्र बंद पाडण्याचा प्रकार त्यावेळी झाला आहे. तर या दूध संकलन केंद्रातील मशीनरी व इतर साहित्य संकलन केंद्र चालू असताना इतर ठिकाणच्या दूध संकलन केंद्रामध्ये हलविण्यात आली आहे. त्यानंतर हे दूधसंकलन केंद्र कायमचे बंद करण्यात आले. यामुळे ३5 वर्षांपासून तालुक्यातील दूध व्यवसायास गळती लागली आहे. शेतकऱ्यांचा कैवारी ठरलेले व दूधगंगा म्हणून ओळखले जाणारे केंद्र आता शेवटची घटका मोजत आहे. आताच्या राजकीय पुढाऱ्यांनी तरी या दूध शीतकरण व संकलन केंद्राच्या पुनर्जीवन करण्यासाठीप्रयत्न करणे गरजेचे आहे. तालुक्यात शासकीय दूध संकलन केंद्र नसल्यामुळे अनेक खासगी दूध संकलन केंद्रे सुरू झाली आहेत. परंतु, त्यांची दूध खरेदी ठराविक असल्यामुळे शिल्लक दुधाची विक्री दूध व्यवसायिकांना कवडीमोल भावाने करावी लागत आहे. अनेक गावांमध्ये बेरोजगार युवकांनी गाई-म्हशी घेऊन दूध विक्री व्यवसाय मोठ्या प्रमाणात सुरू केला आहे. परंतु, दूध संकलन 'खासगी व्यावसायिक आपल्या मनमानी पद्धतीने दूध संकलन करत असल्याने अनेकांना आपला व्यवसाय कायमचा बंद करावा लागला. कोट्यवधी रुपये खर्च करून बांधलेली इमारत, कर्मचाऱ्यांसाठीची निवासस्थाने आतां अखेरची घटका मोजत आहे.चोकट इमारत, कर्मचाऱ्यांची निवासस्थाने मोजू लागली अखेरची घटकाचोकट जिंतूर शहरांमध्ये जवळपास 30 ते 40 खाजगी डेऱ्यांचे संकलन असून अन्न व औषध प्रशासनाच्या दसकीमुळे अनेकांनी खाजगी डेऱ्या बंद केले आहेत .सदरील डेऱ्यावाले दुधामध्ये भेसळ करून विक्री करीत असल्यामुळे अनेकांनी आपला व्यवसाय बंद करून दुसऱ्या व्यवसायामध्ये परिवर्तन केली आहे.चौकटपशुधन विभागा योजनासाठी बँकेत दलालांचा सुळसुळाट पशुधन विभागाच्यावतीने दूध व्यवसाय वाढीसाठी अनेक योजना चालू केली असून त्याचा प्रत्यक्ष लाभ शेतकऱ्यांना होत नाही. यामध्येच राजकीय व नेते एजंट बँकेत वसईला लावून शासनाच्या योजनाचा लाभ घेत असून दूध व्यवसाय मध्ये वाढ होत नाही.चोकट जिंतूर शहरातील खाजगी डेऱ्या बंद झाल्याने दूध उत्पादकांच्या दुधाला चांगल्या प्रकारे भाव मिळत आहे . पंढरीनाथ जगताप दूध विक्रेते पुंगळेकर(जिंतूर )


बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.

कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.


संपर्क क्र. 7588005002

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), गुरुवार १६ जुलै २०२६


## जिंतूर तालुक्यात स्मार्ट मीटर बसवण्याची प्रक्रिया तात्काळ स्थगित करा



**जिंतूर (बी. डी. रामपूरकर)** जिंतूर येथे उपकार्यकारी अभियंता महावितरण यांना माजी आमदार विजयरावजी भांबळे यांच्या नेतृत्वाखाली खालील मागण्यांचे निवेदन देण्यात आले.1.ग्राहकांच्या संमतीशिवाय स्मार्ट मीटर बसवण्याची प्रक्रिया तात्काळ थांबवावी. 2.प्रत्येक ग्राहकाला मीटर बदलण्यापूर्वी लेखी किंवा एसएमएस द्वारे पुरेशी पूर्व सूचना देण्यात यावी. 3.स्मार्ट मीटर मुळे ग्राहकावर कोणताही अतिरिक्त आर्थिक भार पडणार नाही, याबाबत लेखी हमी देण्यात यावी.4.स्मार्ट मीटर मध्ये बिलिंग, रीडिंग व तांत्रिक बाबी बाबत सार्वजनिक जनजागृती मोहीम राबवण्यात यावी.5.मीटर मध्ये बिघाड किंवा चुकीचे बिल आल्यास स्वतंत्र व जलद तक्रार निवारण यंत्रणा कार्यान्वित करण्यात यावी.6.मीटर बदलताना जुन्या व नव्या मीटरची रिडींग ग्राहकाला लेखी स्वरूपात देण्यात यावी. 7.उच्च न्यायालयातील प्रकरणाचा अंतिम निर्णय होईपर्यंत ग्राहकांचे विरुद्ध स्मार्ट मीटर बसवण्याची सक्ती करू नये.तसेच जिंतूर शहर व ग्रामीण भागातील विजेच्या अनेक समस्यांचे प्रश्न यावेळी उपअभियंता महावितरण जिंतूर यांना मांडण्यात आले, तसेच भारनियमन कमी करण्याची मागणी निवेदनात करण्यात आली, यावेळी विश्वनाथ राठोड, अजय चौधरी, कृष्णकांत देशमुख, शंकर जाधव, माणिक हरकळ, लक्ष्मण बुधवंत,बाळासाहेब भांबळे, मुरलीधर मते, गणेश इलग,अविनाश मस्के, कैलास महाराज, विठ्ठल घोगरे,राजेश चव्हाण,माधव घोगरे, जाबीर मुल्ला, करीम लाला, अशोक बंड, मनोहर डोईफोडे,दत्ता काळे , शौकत लाला ,रफिक बेग,अभिजित भांबळे, सचिन राऊत,विश्वंभर पवार,राहुल घुले,प्रवीण चव्हाण ,ग्रामीण तसेच शहरातील अनेक नागरिकांची मोठ्या प्रमाणावर उपस्थित होती.

## सुखाच्या शोधात

सुख शोधता शोधता,
आयुष्य संपत आले.
जे जवळ होते त्याचे,
पूर्णपणे माती झाले. १

जे होते त्याचे उपभोग,
कधी घेता आले नाही.
सरते शेवटी जगण्याकडे,
हतबल होऊन पाही. २

क्षणभरच्या आयुष्याला,
आनंदाने जगून घ्यावे.
कितीही येऊ दे संकटे,
हसत हसत उत्तर द्यावे. ३

मित्रा कमावलेले सारे,
इथेच राहून जाते सर्व.
जीवन जगत असतांना,
उगीच करत होता गर्व. ४

हे माझे ते माझे करत,
गोळा करत बसलो.
सत्य शेवटी कळता,
स्वत: स्वत:वर हसलो. ५



**- नागेश बोंतेवाड**
**छत्रपती संभाजीनगर**

## बकुळी

माझ्या अंगणात
बकुळीचे झाड
रोज पाणी घालून
केली त्याची वाढ

सकाळी सकाळी
फुलांचा सडा
दरवळणाऱ्या गंधाने
जीव होई वेडा

पांढरी नाजूक फुले
डुलतात आनंदाने
लंबवर्तुळाकार
गर्द हिरवी पाने

डेरेदार वृक्ष
सावली देते दाट
सदाहरित बकुळी
किती मोठा थाट

फुलांपासून बनते
सुगंधीत अत्तर
हार आणि गजऱ्यात
असतो सदा वापर



**- रवींद्र चालीकवार**
**मु.पो.ता.महागाव**
**जि.यवतमाळ**
**मो.९०११५५९१०६**

## राजीव गांधी महाविद्यालयातील "करिअर संसद पदाधिकारी" यांचा शपथविधी सोहळा संपन्न




**करमाड :** करमाड येथील राजीव गांधी महाविद्यालयात करिअर कट्टा अंतर्गत करिअर संसद पदाधिकारी यांचा शपथविधी सोहळा कार्यक्रम पार पाडला. महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्र शिक्षण विभाग आणि महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने "करिअर कट्टा" या उपक्रमांतर्गत "करिअर संसदेची" स्थापना करून आज दि.१५ जुलै २०२६ रोजी मुख्यमंत्री व इतर मंत्री सदस्य यांना नियुक्ती पत्र आणि प्रमाणपत्र देऊन त्यांचे अभिनंदन करण्यात आले. महाविद्यालयीन करिअर संसदेचा मुख्यमंत्री कु.सायली संजय पाटुळे, नियोजन मंत्री कु.मयुरी कृष्णा ठोंबरे, कायदे व शिस्त पालन मंत्री कु.गंगासागर दादासाहेब गायके, सामान्य प्रशासन मंत्री कु.निकीता संजय घावटे,माहिती व प्रसारण कु.कोमल बाबासाहेब वाघ, उद्योजकता विकास मंत्री कु.साक्षी कैलास राऊत, रोजगार व स्वयंरोजगार मंत्री आर्यन भरत बहुरे , कौशल्य विकास मंत्री प्रसाद गोकुन सोनार, संसदीय कामकाज मंत्री कु.अनमफातेमा पटेल, माहिती व बालकल्याण मंत्री कु.निकीता शेनफळ कैलकर, सदस्य करण गोपीचंद मारग या सर्वांना नियुक्तीपत्र आणि प्रमाणपत्र देण्यात आले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.सदाशिव मुळे यांनी करिअर संसदेच्या सर्व पदाधिकारी यांना नियुक्ती पत्र देऊन वर्षभराच्या कामकाजासाठी व ऑनलाईन प्रशिक्षण शिबिरासाठी अभिनंदन करुन शुभेच्छा दिल्या. या प्रसंगी महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा.मनोज देवकर सर यांनी देखील मनोगत व्यक्त केले. आय.क्यु.एस.सी.चे समन्वयक डॉ.नरेश डहाळे तसेच महाविद्यालयीन समन्वयक प्रा.डॉ.किशोर काळे,डॉ.अतुल मोरे उपस्थित होते.करिअर संसदेची स्थापना करुन विद्यार्थ्यांच्या सूप्त गुणांना वाव दिल्याबद्दल पालक वर्गानीही करिअर संसद पदाधिकारीचे कौतुक व अभिनंदन केले आहे.




# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), गुरुवार १६ जुलै २०२६


## समाजसेवेचा वसा आणि माणुसकीचा झरा... सौ. रुपालीताई शिंदे



**मुरुम (प्रतिनिधी) :** समाजात अनेक व्यक्ती कार्यरत असतात, पण काही व्यक्ती आपल्या कर्तृत्वाने आणि सेवाभावाने इतरांच्या आयुष्यात आशेचा किरण बनतात. ज्यांच्या शब्दांत मायेची ऊब आणि कृतीत निस्वार्थीपणा असतो, त्या खऱ्या अर्थाने यशस्वी ठरतात. धाराशिव जिल्ह्यातील मुरूमच्या मातीतील एक असेच तेजस्वी आणि प्रेरणादायी व्यक्तिमत्त्व म्हणजे सौ. रुपालीताई शिवाजीराव शिंदे. केवळ कुटुंब सांभाळून न थांबता, सामाजिक जबाबदारीचे भान राखत त्यांनी उभी केलेली ही 'यशोगाथा' आज अनेकांसाठी दिशादर्शक ठरत आहे.संस्कारांची शिदोरी आणि वाटचाल :१६ जुलै १९७७ रोजी मिरज येथे जन्मलेल्या रुपालीताईंचे बालपण संस्कारक्षम वातावरणात गेले. वडील उद्योजक श्री. मारुती खंडारे आणि आई सिंधुताई यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांचे संगोपन झाले. १९९५ मध्ये डॉ. शिवाजीराव शिंदे यांच्याशी विवाह झाल्यानंतर त्यांच्या जीवनाला नवी दिशा मिळाली. डॉ. शिंदे हे भारत सरकारच्या वस्त्र मंत्रालयात वर्ग-१ चे अधिकारी म्हणून कार्यरत असूनही, त्यांनी कधीही सत्तेचा बडेजाव आपल्या व्यवहारात येऊ दिला नाही. साधी राहणी आणि उच्च विचारसरणी हीच त्यांच्या यशस्वी संसाराची गुरुकिल्ली ठरली आहे.व्हीव्हीए फाउंडेशनच्या माध्यमातून सेवाव्रत :रुपालीताईंचा सेवाभाव केवळ बोलण्यापुरता मर्यादित नसून तो 'व्हीव्हीए फाउंडेशन'च्या माध्यमातून प्रत्यक्ष कृतीत उतरला आहे. या कार्यात त्यांची कन्या ऐश्वर्या आणि चिरंजीव प्रतीक यांनाही सहभागी करून घेतले आहे. फाउंडेशनद्वारे शैक्षणिक साहित्याचे वाटप, शाळांचे सक्षमीकरण, निराधार कुटुंबांना मदत, वृक्षारोपण आणि पाणीपुरवठ्यासारख्या सोयीसुविधा पुरवून त्यांनी सामान्य माणसाच्या आयुष्यात आनंद पेरण्याचे काम केले आहे.डिजिटल शिक्षणाचे नवे दालन :मुरूम येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत चार 'स्मार्ट टीव्ही' संच भेट देऊन डिजिटल शिक्षणाची दारे खुली करून दिली. गरीब व होतकरू मुलांच्या शिक्षणाची जबाबदारी उचलण्याचा त्यांचा निर्धार, त्यांच्या संवेदनशीलतेची साक्ष देते. आरोग्य क्षेत्रातील कार्य असो किंवा कोविड काळातील मदत, त्यांनी नेहमीच पुढाकार घेतला आहे.राष्ट्रीय स्तरावर गौरव :त्यांच्या या निस्वार्थी कार्याची दखल राष्ट्रीय स्तरावर घेण्यात आली आहे. २८ एप्रिल २०२५ रोजी पुण्याच्या प्रख्यात लाईफ कोच पूजा ए. शहा यांच्या हस्ते त्यांना रेकी आणि वास्तूशास्त्र या क्षेत्रातील योगदानाबद्दल 'एक्सलन्स अवॉर्ड' देऊन गौरविण्यात आले. हा सन्मान त्यांच्या सामाजिक कार्याच्या यशाचा एक महत्त्वाचा टप्पा आहे.सौ. रुपालीताई शिंदे म्हणजे केवळ एक नाव नसून, ते माणुसकीचे एक व्रत आहे. पती डॉ. शिवाजीराव शिंदे यांची खंबीर साथ आणि स्वतः:ची सेवाभावी वृत्ती यांच्या संगमातून त्यांनी समाजात एक वेगळा ठसा उमटवला आहे. प्रतिकूल परिस्थितीवर मात करत यशाचे शिखर गाठणाऱ्या या 'महानाईकेस' आणि त्यांच्या संपूर्ण परिवारास पुढील वाटचालीस कोटी कोटी शुभेच्छा! सौ. रुपालीताईंना त्यांच्या वाढदिवसा निमित्त हार्दिक शुभेच्छा!

## 'कष्टाच्या वाटा' बालकथासंग्रहाचे प्रकाशन




**छत्रपती संभाजीनगर (प्रतिनिधी) :** हडको येथील गोदावरी माध्यमिक उच्च माध्यमिक विद्यालय येथे मराठवाडा विभागाचे शिक्षक आमदार विक्रम वसंतराव काळे यांच्या शुभ हस्ते नुकतेच छत्रपती संभाजीनगर येथे प्रसिद्ध साहित्य अय्युब पठाण लोहगावकर लिखित कष्टाच्या वाटा या बालकाचा संग्रहाचे प्रकाशन थाटात करण्यात आले. या बाल कथासंग्रहामध्ये दर्जेदार आणि सुसंस्कारित बालकथांचा समावेश असून या कथा बालमनाचा वेध घेणाऱ्या आहेत. याप्रसंगी प्रदीप विखे, मनोज खुटे,मुदस्सर पठाण, रमाकांत छडीदार, वाहेद पठाण तसेच लेखिका श्रीमती आशा डांगे हे या प्रकाशन सोहळ्याच्या कार्यक्रमाला उपस्थित होते.






## डॉ. सुधीर देवरे यांची दोन पुस्तके प्रकाशित



**सटाणा (नाशिक) :** येथील ज्येष्ठ साहित्यिक, भाषातज्ज्ञ, समीक्षक, संशोधक व भाषा, कला, लोकजीवन, लोकसंस्कृती यांचे अभ्यासक डॉ. सुधीर रा. देवरे यांची दोन पुस्तके शब्दालय प्रकाशनातर्फे नुकतीच प्रकाशित झाली. या पुस्तकासह डॉ. सुधीर देवरे यांची आतापर्यंत ३९ पुस्तके प्रकाशित झाली आहेत. 'संथ थंड संगाशी संग (कवितासंग्रह)' आणि 'आयता धनवरला नागोबा' (अहिराणी कथासंग्रह) अशी ही दोन पुस्तके आहेत. 'डंख व्यालेलं अवकाश', 'आदिम तालनं संगीत', 'कला आणि संस्कृती: एक समन्वय', 'अहिराणी लोकपरंपरा', 'अहिराणी गोत', 'अहिराणी वट्टा', अहिराणी लोकसंस्कृती', 'अहिराणीच्या निमित्तानं: भाषा', 'अहिराणी : भाषा, परंपरा आणि संस्कृती', 'भाषा : व्याप्ती आणि गंड', 'मी गोष्टीत मावत नाही', 'सोन्याची शाळा', 'गावदंडी', 'डोंगरदेव', 'माणूस जेव्हा देव होतो', 'सहज उडत राहिलो', 'साहित्य : जाणिवा, मीमांसा आणि समीक्षा', 'आस्वाद: भावलेल्या कवितांचा', 'माणसं मरायची रांग', 'ब्लॉगच्या जाळ्यातून जग', 'सायकोचा तिढा', 'समीक्षा : साहित्य, कला आणि जीवन', 'पाय नसलेली माणसं', 'मानोसना शंभर वरीस', 'भाषा अहिराणी' आदी डॉ. सुधीर देवरे यांची या आधीची ग्रंथसंपदा आहे.




# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com


छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), गुरुवार १६ जुलै २०२६


## अनिकेत नेमाडेचे भारत टॅलेंट सर्च (BTSE) परीक्षेमध्ये यश



**छत्रपती संभाजीनगर :** राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 नुसार जीवनाभिमुख शिक्षण देणारे पहिले पाऊल या व्यापक दृष्टिकोनातूनएज्यूमीट अकॅडमीने (महाराष्ट्र) आयोजित केलेल्या 'भारत टॅलेंट सर्च' (BTSE) परीक्षेत वूडरिजहायस्कूलचा विद्यार्थी अनिकेत हेमंत नेमाडेने पीएमश्री जिल्हा परिषद केंद्रीय उच्च प्राथमिक शाळा सातारा (खंडोबा) केंद्रातून इ. आठवी वर्गामधून सर्व द्वितीय क्रमांक मिळवला असून राज्य गुणवत्ता यादीत 49 वा क्रमांक मिळवत त्याने यश संपादन केले आहे. छत्रपती संभाजीनगर तालुकास्तरीय पारितोषिक वितरण समारंभ जिल्हा परिषद केंद्रीय उच्च प्राथमिक शाळा सातारा (खंडोबा) येथे संपन्न झाला.या प्रसंगी ज्येष्ठ शिक्षण विस्तार अधिकारी श्रीराम केदार, केंद्रप्रमुख मुख्याध्यापक रमेश परदेशी, केंद्रप्रमुख गजानन नेहाले ,केंद्रप्रमुख भरत संत, राष्ट्रीय शिक्षक पुरस्कार प्राप्त नारायण मंगलारम, BTS राज्य मार्गदर्शक ज्ञानदेव नवसरे राज्य शिक्षक पुरस्कार प्राप्त संजय खाडे यांच्या हस्तेअनिकेत नेमाडेला स्मृतिचिन्ह, प्रमाणपत्र व ग्रंथ भेट देवून त्याचा सत्कार करण्यात आला. यापूर्वी अनिकेत नेमाडेने डॉ.होमी भाभा बालवैज्ञानिक कॉम्पिटिशन, शिष्यवृत्ती परीक्षा आय.एम.ओ. ,आय.ई.ओ., एन.एस.ओ. या ऑलंपियाड परीक्षेतही गोल्ड मेडल आणि सिल्वर मेडल मिळाले आहे. या यशाबद्दल शोभा नेमाडे राजश्री नेमाडे, हेमंत नेमाडे, सुरेखा शिंदे,आर्यन शिंदे, स्वराज शिंदे यांनी अनिकेतचे अभिनंदन केले आहे.

## 'इकरा'च्या मंचावर गणिताची धूम,करिअर गुरु अनिस कुट्टी यांच्या ट्रिक्स ठरल्या 'सुपरहिट'!







**जळगाव (प्रतिनिधी) :** राष्ट्रीय स्तरावरील प्रसिद्ध करिअर मार्गदर्शक आणि गणिततज्ज्ञ मा.अनिस कुट्टी यांनी आपल्या अनोख्या अध्यापन शैलीने,गणिताच्या सोप्या क्लृप्त्यांनी आणि प्रभावी मार्गदर्शनाने इकरा पब्लिक स्कूल, इकरा शाहीन नीट, इकरा BUMS, इकरा D.Ed व इकरा बी.एड च्या विद्यार्थ्यांना मंत्रमुग्ध केले.विद्यालयात आयोजित विशेष करिअर मार्गदर्शन शिबिरात ते बोलत होते.आपल्या अभ्यासपूर्ण भाषणात श्री.कुट्टी यांनी विद्यार्थ्यांना आपल्या विचारांची क्षितिजे रुंदावण्याचे आवाहन केले. केवळ पारंपरिक शिक्षणापुरते मर्यादित न राहता एनडीए (NDA) आणि विविध राष्ट्रीय शिष्यवृत्ती परीक्षांचे महत्त्व त्यांनी पटवून दिले.स्पर्धा परीक्षेत यश मिळवण्यासाठी 'एनसीई-आरटी' (NCERT) पुस्तकांचा अभ्यास किती महत्त्वाचा ठरतो, हे त्यांनी आपल्या खुसखुशीत शैलीत स्पष्ट केले.यावेळी मार्गदर्शन करताना त्यांनी उपस्थित विद्यार्थिनींचा आत्मविश्वास वाढवला."तुमचा हिजाब तुमच्या ध्येयाच्या आड कधीही येऊ शकत नाही.हिजाब परिधान करूनही तुम्ही जगातील प्रत्येक क्षेत्रात उंच भरारी घेऊ शकता,"अशा शब्दांत त्यांनी विद्यार्थिनींना प्रोत्साहित केले.या कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी करिअर आणि भविष्यातील आव्हानांबाबत विचारलेल्या विविध प्रश्नांना श्री.कुट्टी यांनी अत्यंत सोप्या भाषेत उत्तरे दिली.उपस्थित विद्यार्थ्यांनी या मार्गदर्शनातील महत्त्वाचे मुद्दे आपल्या वहीत टिपून घेतले. कार्यक्रमाच्या सुरुवातीला डॉ.करीम सालार यांनी पुष्पगुच्छ देऊन प्रमुख पाहुण्यांचे स्वागत व सत्कार केला, तर संपूर्ण कार्यक्रमाचे बहारदार सूत्रसंचालन श्री.इफ्तिखार गुलाम रसूल सर यांनी केले.






# वायदा आदिवासींना फायदा कंपन्यांना हे सरकारचे धोरण



**कन्नड (अरुण थोरात) :** वायदा आदिवासींना, फायदा कंपन्यांना हा सध्या च्या सरकारचा कारभार असल्याने, जल जंगल जमीनीचे मुळ मालक असलेल्या आदिवासींना सरकार हुसकावून लावण्याचा प्रयत्न करीत असल्याचे मत सत्यशोधक ग्रामीण कष्टकरी सभेचे राज्य सेक्रेटरी कॉम्रेड किशोर ढमाले यांनी व्यक्त केले आहे. ते मोगरपाडा, ता. साक्री, जि. धुळे येथे दि. 14 जुलै रोजी सत्यशोधक शेतकरी सभा व सत्यशोधक ग्रामीण कष्टकरी सभेच्या वतीने आयोजित 19 वा संघर्ष दिन मोगरपाडा कार्यक्रम प्रसंगी बोलत होते. जल, जंगल, जमीन, रोजगार, शिक्षण आणि आदिवासी हक्कांच्या संरक्षणासाठी हजारो सत्यशोधक, शेतकरी, शेतमजूर, महिला व आदिवासी बांधव या संघर्ष दिनासाठी एकवटले होते.कार्यक्रमाची सुरुवात ऐतिहासिक संघर्षस्थळी करण्यात आली. ज्या ठिकाणी सुजलान कंपनीने टॉवर उभारण्यासाठी खड्डा खोदण्याचा प्रयत्न केला होता आणि जिथे आदिवासींवर लाठीचार्ज व गोळीबार झाला होता, त्या ठिकाणी लाल झेंड्याला लाल सलाम करून महात्मा फुले रचित "सत्याचा अखंड" गायन करण्यात आले. त्यानंतर "चले जावं सुजलान वाले चले जावं", "जमीन आमची हक्काची", "लढेंगे-जितेंगे", "जल-जंगल-जमीन आमची आहे" अशा घोषणांनी परिसर दणाणून सोडत संघर्ष रॅली सभास्थळी दाखल झाली. सभेला सत्यशोधक कम्युनिस्ट पक्षाचे राज्य सचिव कॉम. किशोर ढमाले, जिल्हाध्यक्ष कॉम. आर. टी. गावीत, संविधान अभ्यासक अनंत भवरे, कॉम. कारणशिंग कोकणी, लिलाताई वळवी, शीतल गावीत, लालाबाई भोये, यशवंत माळचे, मेरूलाल पवार, दिलीप गावीत आदी मान्यवरांनी मार्गदर्शन केले.वक्त्यांनी केंद्र व राज्य सरकारच्या आदिवासी, शेतकरी आणि कष्टकरीविरोधी धोरणांवर टीका करत वनहक्क कायदा-2006 ची प्रभावी अंमलबजावणी, आदिवासींना त्यांच्या जमिनींचे सातबारा व जीपीएस मोजणीसह हक्कपत्रे, शेतकऱ्यांची संपूर्ण कर्जमाफी, आदिवासींवरील अत्याचारांना आळा, शिक्षण व रोजगाराचा हक्क, सर्वांसाठी सामाजिक सुरक्षा, आदिवासी शेतकऱ्यांना किसान सन्मान योजना लागू करणे, दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना नुकसानभरपाई, तसेच सर्वांना शिक्षण व रोजगाराचा अधिकार देणारे कायदे करण्याची मागणी केली.संघर्ष दिनात मंजूर करण्यात आलेल्या प्रमुख मागण्यांमध्ये आदिवासीविरोधी वनकायदा-2023 रद्द करणे, वनहक्क दाव्यांची तातडीने पूर्तता, आदिवासींवरील अत्याचार करणाऱ्यांवर कठोर कारवाई, राष्ट्रीय शिक्षण धोरण रद्द करणे, जनसुरक्षा कायदा रद्द करणे, शिष्यवृत्ती वाढविणे, आदिवासी स्त्री-पुरुष समानतेसाठी स्वतंत्र कायदा, तसेच शेतमालाला हमीभावाची कायदेशीर हमी देणे या मागण्यांचा समावेश होता.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अशपाक कुरेशी व जितू पवार यांनी केले. शेवटी सत्यशोधक चळवळीतील दिवंगत कार्यकर्ते जेंता गावीत व चंपा मास्तर यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. हजारोंच्या उपस्थितीत झालेल्या या संघर्ष दिनाने जल, जंगल, जमीन आणि लोकशाही हक्कांच्या लढ्याला नवचैतन्य मिळाल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली. "सत्य की जय हो! लाल सलाम!" च्या घोषणांनी कार्यक्रमाची सांगता झाली.

# कलाकार समाजजीवनाला टवटवी देतो : डी.बी. जगत्पुरिया




**कन्नड (प्रतिनिधी) :** 'नानाई फिल्मस् प्रॉडक्शन' चे लेखक/दिग्दर्शक व सिनेअभिनेता प्रविणकुमार अहिरे हे आचार,विचारांचा समन्वय घडवीत प्रभावी दिर्घलघूपट निर्माण करतील ही खात्री आहे. असे विचार विख्यात समीक्षक व विचारवंत डी.बी.जगत्पुरीया यांनी कन्नड शिक्षक सभागृहात नानाई फिल्मस् प्रॉडक्शन च्या ऑडीशन कार्यक्रमात व्यासपीठावरुन बोलतांना व्यक्त केले.निर्माती सौ.अर्चना प्रविणकुमार अहिरे यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधत काल "कोयताबंद" व "हुंदका - द व्हायरस" अशा दोन दिर्घलघुपटांसाठी अभिनय चाचणी घेण्यात आली.या कार्यक्रमाचे उद्घाटन मराठी,हिंदी चित्रपट व टी.व्ही.स्टार सुप्रसिद्ध सिनेअभिनेते सुनील गोडबोले यांच्या शुभहस्ते करण्यात आले.मंचावर महाराष्ट्र राज्य शिक्षक व शिक्षकेतर सेनेचे राज्य समन्वयक दिपकदादा पवार,लोकशाहीर सि.के. मिस्तरी सर अभिनेत्री अनुपमाताई पाटील,लेखक बशिरमियाँ देगलूरकर,पत्रकार संघटनेचे विठ्ठल शिरसे यांची विशेष उपस्थिती होती. तर नागद गटाचे जिल्हा परिषद सदस्य दिलीपसिंग राजपुत, डॉ.सौ.प्रीती राजपुत व जेष्ठ पत्रकार राजेंद्र सुरडकर यांनी भेट देऊन उपक्रमाचे कौतुक करत शुभेच्छा दिल्यात. महाराष्ट्रभरातुन बहुसंख्य कलाकार ऑडीशनला हजर होते.उसतोड कामगारांची व्यथा व त्यांच्या मुलांच्या शिक्षणावर होणार्या परिणामांची ज्वलंत कथा मांडणारा "कोयताबंद" आणी कोरोनाग्रस्त वाटसरुंची करुण कहानीचे विदारक सत्य सांगणारा "हुंदका - द व्हायरस" दिर्घलघुपटांचे लवकरच ग्रामीण भागातुन चित्रिकरण सुरु होणार असल्याचे नानाई फिल्मस् प्रॉडक्शनचे प्रविणकुमार अहिरे व सौ.अर्चना अहिरे यांनी सांगितले.

१० वी, १२ वी पास (कोणतीही शाखा)
विद्यार्थ्यांसाठी सुवर्ण संधी

D.M.L.T
Diploma In Medical Laboratory Technology

- महाराष्ट्र पॅरामेडीकल कॉन्सीलमध्ये नोंदणी करता येते.
- सरकारी / निमसरकारी हॉस्पीटलमध्ये लॅब असिस्टंट होण्याची संधी.
- शासकीय नोकरीसाठी मान्यता प्राप्त.
- हा कोर्स झाल्यानंतर डायरेक्ट BSC ला ॲडमीशन भेटेल ११ वी, १२ वी सायन्स करण्याची गरज नाही.


डॉ.दत्ताभाऊ पाथ्रीकर शिक्षण प्रसारक मंडळ संचलित
मातोश्री डॉ.कंचन शांतीलालजी देसरडा पॅरामेडिकल कॉलेज.
बीबीका मकबऱ्याच्या मागे, हनुमान टेकडीजवळ, पहाडसिंगपुरा, छ.संभाजीनगर (औरंगाबाद.)
9405109103
8830838903

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), गुरुवार १६ जुलै २०२६


# एका कादंबरीचा अन्वयार्थ - चिंतन चिकित्सक साक्षेपी समीक्षा




प्रा. डॉ शरद बोराडे यांचा एक अभ्यासनीय शोध प्रबंध आहे.मराठी वाड्मयातील अंशीच्या दशकातील एक सिद्धहस्त कादंबरीकार बाबाराव मुसळे हे तिसऱ्या पिढीतील कांदबरीकार.यांच्या 'हाल्या हाल्या दूधू दे!'या कांदबरीने तत्कालीन ग्रामीण वास्तवाचे एक भेदक वास्तव मांडणारी ही वास्तववादी कांदबरी.आहे.या कांदबरीचा एक सृजनशील अभ्यासक म्हणून डॉ शरद बोराडे यांनी केलेल चिंतन चिकित्सक अभ्यासक म्हणून कांदबरीचा अन्वयार्थ ही मांडणी.अतिशय तंत्र कौशल्य पुर्वक आहे.म्हणजे कथा कादंबरी नाटक यांचा अभ्यासपूर्ण ताळा कसा असावा हे एक कुशल कौशल्य या पुस्तकाने दिले आहे.ही अभ्यासकाची दृष्टी अत्यंत महत्त्वाची आहे.म्हणूनएक पटकथा संवाद आणि पात्रांचा परिचय यातून एक सिनेमा आपल्या नजरेत भरतो हेच अभ्यासाचे तंत्र कौशल्य आत्मसात करून वाचकांचे मन खिळवून जाते.साहित्यकृतीचा अभ्यास करताना.लेखक ज्या मनोभूमिकेतून कांदबरी लिहितो.ती लेखनामागील भूमिका अभ्यासकाला उलगडून दाखण्याचे कसब या कांदबरी संशोधन प्रबंधात केले आहे.लेखक बाबाराव मुसळे यांच्या आत्म्यानुभूती व कृषकांची रोजनितीआणि भूमीनिष्ठांची मांदियाळी या कांदबरी लेखनात जानवते याचा उतवाच्य तर आहेच पण गावं शिवारातील सुखदु:खाच्या कथेंचा ऊहापोह करत तत्कालीन शेतकरी शेतमजूर व कष्टकरी यांच्या जगण्याचा तिढा,बेभरवशाची कुणबीक आणि नात्यांच्या जंजाळातून आडकवणारी बेरकी माणूस.तसा माणूसकिचा गहिवर तर होताचा पण तितकाचा रघतपारखेपणाचा कळस गाठला.रक्ताची नाती गोती विसरत चालली खुन्नशी माणसं ही कशी होती यांचा ही अनुबंध या लेखनात आलेला आहे.कांदबरीचे शिर्षक त्या काळात अवघ्या महाराष्ट्राने डोक्यात घेतले होते.इथल्या दावनीला बांधलेला हाल्या म्हसीचा मोठा रेडा तो फक्त सर लावण्यासाठी अन् म्हशीला गाभ करण्यासाठीचं.पण ज्याच्यादावणीला-हाल्या त्याला साऱ्या गावभर मान म्हणजे म्हशीला गाभ करुन आणने.लाऊन आणने.इथं कितीही प्रयत्न करा पण पान्हा फुटणार नाही म्हणून उगीच 'हाल्या हाल्या दूधू दे!अशी म्हण आहे.या कादंबरीकारीतील मुख्यपात्र न्यानबा आणि त्याच्या अतोनात खडतर जगण्याच्या हीशोकांतिका आहे.आपल्याचं जवळीची माणूस जोपर्यंत आपल्याकडे गुळ आहे तोपर्यंतचं ही मुंगळे तशी अवस्था.सुखात सारे दु:खात फक्त तोंडापुर्ते.न्यानबा आपला सरळ मार्गी शेती मातीशी इमान घेऊन जगणारा.आनसा त्याचीबायको. शोभा ही तिची मुलगी.न्यानबाच्या मेव्हण्याच्या गळाला लागून न्यानबा कर्जबाजारी झाला.लग्न सावकारी कर्ज काढून हुंडा देऊन केले पण सासऱ्यानं तिच्यावर वाईट नजरेनं तिचा छळ केला.तिने पतीला सांगितले अन् शेवटी तिनं सासर सोडलं.नवरा पागल झाला.हा अल्पसा कथासार.ख्यातनाम समीक्षक अभ्यासक डॉ रामचंद्र कांळूके प्रस्तावनेत लिहितात "एखाद्या कांदबरीचा अभ्यास किती विविध अंगांनी,किती सखोल आणि समग्र पध्दतीने करता येतो,याचा वस्तुपाठच या ग्रंथांतून मिळतो.आजच्या वर्तमानकाळात ही 'हाल्या हाल्या दूधू दे!'या कादंबरीकारीचे समकालीनत्व ठळकपणे जाणवते.आणि म्हणूनचं तिच्यावर आधारित या समीक्षा-ग्रंथाची अत्यंत निकड निर्माण होते.ती गरज हे पुस्तक समर्थपणे भागवते.त्यामुळे वाचक, अभ्यासक, आणि संशोधक या सर्वांकडून या ग्रंथाचे स्वागत निश्चितच होईल"(पृ.१२प्रस्तावना) म्हणजे हा संशोधन ग्रंथ साक्षेपी समीक्षेचा नमुना आहे.पागल झाला.अशी ही शोकांतिका.संशोधक डॉ शरद बोराडे यांनी अतिशय आशय संपन्न अभ्यासपूर्ण साक्षेपी संशोधन ही कांदबरीची समीक्षा आहे.यात प्रकरण पहिले' मराठी ग्रामीण कांदबरीचा आरंभ ते 'हाल्या हाल्या दूधू दे!'पर्यंतचा प्रवास'यात लेखकांनी अतिशय सखोल आजपर्यंताचा कांदबरीचा वाड्मयीन इतिहास ते समकालीन परिप्रेक्ष्यातील समीक्षा याचा अन्वअर्थ लावला आहे जसे कांदबरीचे स्वरूप विशेष,इ.स.१८८०ते १९४०च्या दरम्यानाची ग्रामीण कांदबरी,सर्व कांदबरीकारांचा सविनय उल्लेख व मराठी ग्रामीण कादंबरीकार बाबाराव मुसळे यांच्या 'हाल्या हाल्या दूधू दे!'चे स्थान अधोरेखित केले आहे.जसे"स्वातंत्र्यानंतर आणि विशेषत्वाने १९७५नंतर ग्रामीण साहित्याच्या चळवळीच्या उदयाने या प्रवासाला विशिष्ट अर्थ प्राप्त झाला आहे.स्वातंत्र्योत्तर काळात अनेक दमदार आणि अव्वल दर्जाच्या ग्रामीण कांदबरीची निर्मिती झालेली आहे '(पृ.३६)हा अतिशय मौलिक चिंतन आशय हा अभ्यासपूर्ण आहे.दुसरे प्रकरण 'हाल्या हाल्या दूधू दे!मधील व्यक्ती चित्रणे'ही खरी अभ्यासकांची कसोटी असते. संपुर्ण व्यक्तीचित्रणाची चाळणी करून स्त्री पुरुष यांची प्रकृती धर्म,बोली भाषेचा ढब या कांदबरीची भाषा ही वैदर्भीय आहे.अभ्यासक शरद बोराडे यांनी ' ग्रामीण कांदबरी व व्यक्तिचित्रण, प्रमुख पुरुष व्यक्तीरेखा-न्यानबा,शंकर पाटील, संतोबा सावकार,मामा(आनसाचा भाऊ), संभा, शोभाचा सासरा,शोभाचा पती, प्रमुख स्त्री व्यक्तीरेखा,आनसा, शोभा, रखमी, वछिला, भ्रष्टाचारी कर्मचारी,पांडेबुवा, सोसायटीचा कारकुन,गौण व्यक्तीरेखा जसे जन्यामांग,निळा वारीक,गुंफा, शामा डॉक्टर,रंगा, बळीराम, वसंत राघोव,या संपूर्ण व्यक्तीरेखावर ही कांदबरी कशी उभी राहिली आहे.याचा अभ्यासक म्हणून ती तिचे विवेचन केलेले आहे.जसे मतलबी मामा "आनसाचा भाऊ,यानेच शोभाचं लग्न श्रीमंत घरात लावून दिलं घर श्रीमंत आहे,परंतु सासरा वाईट नजरेचा आहे.हे माहित असूनही पैशाच्या लोभाने शोभाचा मामा तिला त्या घरी देतो"(पृ.४५)अशी सारीचं व्यक्तीरेखा व त्यांचे गुण अवगुण अतिशय तिर्राहितपणे मांडली आहेत ही खरी साधनेची सार्थक समीक्षा या ग्रंथात दिसून येते.प्रकरण तिसरे'ग्रामीणता आणि वास्तवता' वाड्मयीन परिप्रेक्ष्यातूनडॉ शरद बोराडे हे अतिशय चिंतन चिकित्सक अभ्यासक भूमिकेतून तत्कालीन ते समकालीन ग्रामीण वास्तवाचे परिक्षण करुन समीक्षण करतात म्हणजे अजूनही रूढी परंपरा भाकडकथेला मुठमाती अंधश्रद्धा, दुष्काळ, शेती मातीशी असेलल्या निष्ठा.राजकीय व सामाजिक संदर्भ यावास्तवात ते संदर्भ 'हाल्या हाल्या दूधू दे! मधील ग्रामीण वास्तवता,अ) लग्नाच्या निमित्ताने होणारे वास्तव, बी)ग्रामीण भागातील शासकीय भ्रष्टाचार,क) सावकारी प्रवृत्तीच्या रुपांन प्रकट होणार वास्तव, इ)श्रध्दा-अंधश्रध्देच्या रूपानं चित्रित झालेलं ग्रामीण जीवनातील वास्तव, यांच्या अभ्यास समग्रतेचा अनुबंध हा श्रेष्ठत्वाचा झाला आहे ते लिहितात "ही ग्रामीण कांदबरी असल्याकारणाने तिच्या मधून वारंवार ग्रामीणत्वाचा प्रत्यय येतो.तसेच हे विदर्भातील शेतकऱ्यांचे वास्तव चित्रण असल्यानेही या दहाक वास्तवाचाही प्रत्यय देते"(पृ.७५)या कादंबरीचे वाड्मयीन व भाषिक मूल्यमापन' हे चौथे प्रकरण म्हणजे अभ्यासक म्हणून डॉ शरद बोराडे यांचे भाषीक चिंतन अतिशय अभ्यासपूर्ण आहे.जसे मुखपृष्ठ शिर्षक,कथानक, मध्यमवर्गीय शेतकऱ्यांची शोकांतिका.न्यानबा काळे कादंबरीचा नायक,संतोबा सावकारचं कर्ज, गळ्याला कॅन्सरची गाठ,शोभानं भूडकीत उडी मारून जीव देणे.आनसा, प्रकाश,संभा यांच्यापाठीमागे न्यानबा आपला जीव सोडून देतो.ही सारी मूल्यमापनाची कसोटी लावून संशोधकाने अतिशय मर्मग्राही आस्वादक मूल्यमापन केले आहे.यातून त्यांच्या चिंतन चिकित्सक अभ्यासक विवेचक समीक्षक दिसून येतो.भाषाशैली , प्रादेशिकता, बोलीभाषा, ग्रामीण शब्दांचा वापर, विदर्भातील शब्द,शिव्यांचा वापर, इंग्रजी शब्दांचा वापर,याचा अभ्यासपूर्ण उहापोह आहे.समारोपत संशोधक डॉ शरद बोराडे लिहितात "निवेदन पध्दतीच्या बाबतीत मत असे आहे कांदबरी लेखकाने प्रथमपुरूषी निवेदन पध्दती बरोबरच तृतीयपुरूषी निवेदनपध्दतीचायथायोग्य पध्दतीने वापर केलेला आहे.त्यामुळे कादंबरीतील निवेदनपध्दतीत कुठल्याही प्रकारचा विस्कळीतपणा दिसून येतं नाही.ग्रामीण जीवनातील समर्पक प्रतिमांचा वापर हे या कांदबरीचे वैशिष्ट्य आहे "(पृ.९९)हा अभ्यास आशय या ग्रंथाचा आहे.या समीक्षा ग्रंथाची पाठराखण ख्यातनाम समीक्षक संतविवेकी डॉ सतीश बडवे लिहितात "शरद बोराडे यांनी अभ्यासपूर्ण दृष्टीने या कांदबरीचा वेध घेतला आहे.परिणामी कांदबरीचेलेखन वैशिष्ट्ये, परिणामकारक स्वभावचित्रण, सामान्य माणसांची व्यक्तीचित्रे,ओढ लावणारी लेखनशैली, यामधून कांदबरीचे कथानक कसे उलगडत जाते.याचा शोध घेण्याचा प्रयत्न.जाणतेपणाने कांदबरीचे अवलोकन करून वाड्मयीन दृष्टीने त्याची विवेचक भूमिकेतून चर्चा करण्याची अभ्यासकांची भूमिका प्रशंसनीय आहे यात शंका नाही."(पाठराखण)ही गुरूदत्त साहित्य समीक्षक वाणीतून केलेली पाठराखण म्हणजे हा आत्मिक स्वानंद आहे.पालवी प्रकाशनचे डॉ कैलास कळकटे यांनी अतिशय उत्तम पुस्तक बांधनी केली आहे. डॉ शरद बोराडे यांच्या अर्पण पत्रिका मन गहिवरून टाकते.या शैक्षणिक संघर्षातील चुका होऊन ही उच्च शिक्षणाची संधी दिली.त्या माय बापांच्या चरणी अर्पण...!

**पुस्तक:-हाल्या हाल्या दूधू दे!एक अन्वयार्थ समीक्षक:- डॉ शरद बोराडे,परतूर, जालना प्रकाशक:- पालवी प्रकाशन, ता.शहापूर, जि.ठाणेप्रकाशक:- डॉ कैलास कळकटे प्रथमावृती:-१ जानेवारी २०२६किंमत:- १५०/रुपये**



**पुस्तक परिचय - डॉ प्रभाकर शेळके, जालना**


बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002